<u>नियमित दिवाणी दावा १२६/२०१५</u>
राम कृष्णा शिंदे
वि.
विठू अर्जुना शिंदे

## नि.७० खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी त्यांनी नि. ५५, ५६, ५७ या दिलेल्या अर्जांमध्ये दुरुस्ती होणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांना सदर अर्जावर म्हणणे दाखल करण्याकरिता वारंवार संधी देवूनही त्यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे सदर अर्ज प्रतिवादी यांचे म्हणणे नाही असा आदेश पारीत करून पुढे चालविण्यात आलेला आहे.

३. वादी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र. १३ श्री. बापूसो हरी मोळे मयत असून त्यांची मुलगी हिचे नाव रंजना विनायक पाटील असे असून नि. ५५, ५६, ५७ च्या अर्जांमध्ये तिचे नाव रंचना निवास पाटील असे नमूद झालेले आहे. त्यामुळे सदरबाबत दुरुस्ती होणे अत्यंत गरजेचे आहे. अंतिमतः वादी तर्फे वकील यांनी दुरुस्ती अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

४. वादी यांचा अर्ज व कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी यांनी दावा वाटप तसेच अतिक्रमण काढून खुला कब्जेमिळणेकरिता दाखल केलेला आहे. तसेच वादी मागत असलेली दुरुस्ती ही अत्यंत किरकोळ स्वरुपाची आहे असे वाटते. तसेच वादी मागत असलेली दुरुस्ती पाहता त्याबाबत प्रतिवादी यांना स्पष्टीकरण देण्याचा पुर्ण अधिकार आहे असे वाटते. त्यामुळे वादी यांचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब मी पुढील आदेश पारीत

करत आहे.

## <u>आदेश</u>

**१. वादी यांचा नि.७० वरील अर्ज रक्कम रु. २००/- सरकार जमा करण्याच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.**

**२. वादी यांनी दाव्यात दुरुस्ती १४ दिवसात करुन तात्काळ दुरुस्ती प्रत दाखल करावी.**

**सही/-**
**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.

पन्हाळा
दि.१०.०३.२०२६